# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 02/06/2021 (बुधवार)

(दुपार)

---

### विनयभंग

पो.स्टे. सावनेर :– दि. 21/04/2021 चे 09:00 वा. चे सुमारास 22 वर्षीय पीडित/फिर्यादी हिचा आरोपी नामे– वसीम अनवर अंन्सारी, वय 25 वर्ष, रा. जगदिश नगर, कपील किराणा स्टोर जवळ नागपुर याने त्याच्या व्हॉटसप मोबाईल वर यातील फिर्यादीचा विना चेहराच्या नग्न फोटो डिपी ठेवुन त्याने फोटो सार्वजनिक करून बदनामी तिची केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 354 (क), 501, 504, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोधे घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री सतीश पाटील मो नं. 8805253982 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 07 कि.मी. अंतरावरील काटोल ते पारडसिंगा रोड खानगाव काटोल येथे दिनांक 31/05/2021 चे 21:00 वा. ते 21.30 वा. दरम्यान ईश्वर बाबुजी अलोने(मृतक) वय 60 वर्ष रा. तिनखेडा हे काटोल ते पारडसिंगा रोडने पारडसिंगा कडे पायदळ जात होते. त्यादरम्यान त्यांचे मागुन येणारी एम.एच–40/एडी– 1482 क्रमांकाचा मोटरसायकलचा चालक आरोपीने त्याचे मोटरसायकलवर मागे एक ईसमास बसवुन त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजिपणे चालवित आणुन पायदळ जाणाऱ्या ईसमास मागुन जोरात धडक दिली. या अपघातात ईश्वर अलोने यांच्या डोक्याला गंभीर मार लागुन त्यांचे मरणास आरोपी कारणीभुत ठरला. तसेच स्वःता व मागे बसलेल्या इसमास जखमी करण्यास आरोपी कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सरतर्फे पो.ना. राजेश रेवतकर पो.स्टे.काटोल यांनी दिलेल्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास परीपोउपनी श्री लांजेवार पो.स्टे. काटोल मो.नं. 9764190951 हे करीत आहे.

2) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 03 कि.मी. अंतरावरील मौजा शितलवाडी रामटेक येथे दिनांक 29/05/2021 चे 13:30 वा. ते 14.00 वा. दरम्यान एमएच– 40/बीई–6136 क्रमांकाच्या कारचा चालक आरोपीने त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच– 40/क्यु– 4458 क्रमांकाच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल स्वार/ मृतक नामे– हंसराज वासुदेव नाईक, वय 52 वर्ष, रा. रामटेक हे गाडीसह खाली पडले. त्यामुळे त्याच्या डोक्याला, डावा हात आणि उजव्या पायाला गंभीर मार लागल्याने त्याला उपचाराकरीता न्युरॉन हॉस्पीटल धंतोली नागपुर येथे नेवुन भर्ती केले असता उपचार दरम्यान दि. 01/06/2021 रोजी सकाळी 09.12 वा. मरण पावला. पो. स्टे धंतोली नागपुर मर्ग क्र. 00/21 कलम 174 जाफौ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– श्रेयस हंसराज नाईक वय 20 वर्ष रा. राधाकृष्ण वार्ड रामटेक यांनी दिलेल्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका

कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी दत्तप्रसाद शेंडगे पो.स्टे रामटेक मो. नं. 9011253003 हे करीत आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो. स्टे. खापरखेडा :– फिर्यादी नामे– सौ. उर्वशी विलास गायकी, वय 25 वर्ष, रा. भानेगाव व आरोपी नामे– 1) पति– विलास उकुडराव गायकी, वय 34 वर्ष, रा. भानेगाव हे दोघेही पतीपत्नी आहेत. यादोघांचे दि. 09/01/2021 ला लग्न झाले असुन लग्नानंतर फिर्यादीचा मित्र फिर्यादीचे घरी येवुन ''फिर्यादी सोबत माझे प्रेम संबंध आहे'' असे सासरे कडील लोकांना म्हणुन झगडा भांडन करून निघुन गेला. यानंतर आरोपी क्र 1. ने फिर्यादीचे माहेरकडील लोकांना बोलावुन मिटींग केली व फिर्यादीला माहेरच्या घरचे लांकासोबत माहेरी पाठविले. परंतु 04 महीने लोटुन ही आरोपी क्र 1 फिर्यादीला घेन्यास गेला नाही. त्यामुळे फिर्यादीने सासरी घेवुन जानेबाबत आरोपीला वेळोवेळी फोन केले असता ''मला तुला ठेवायचे नाही'' असे म्हणुन मानसिक त्रास देत होता. फिर्यादी ही दिनांक 31/05/2021 रोजी मौजा भानेगाव येथे दुपारी सासरी राहन्यास आली असता आरोपी क्र 1 व 2) शशीकला उकुडराव गायकी वय 60 दोन्ही रा भानेगाव ''तु येथे कशाला आली लग्नाआधी तुझे प्रेमसंबध आहे, तुला येथे राहायचे असेल तर वडीला कडुन 10,000,00/–रू. घेवुन ये'' असे म्हणुन मानसिक त्रास देवुन दि. 01/06/2021 चे 01.30 वा. ते 01.50 वा दरम्यान आरोपी क्र 1 व 2 यांनी झागडा भांडण करून आरोपी क्र 01 नी फिर्यादीचे दोन्ही हातावर उरखडले व ब्लेडने हातावर मारून जखमी केले. तसेच आरोपी क्र 02 डोक्याचे केस पकडुन ढकलढुकल केले आरोपी 3) संदीप चलपे 4) शोभना संदीप चलपे दोन्ही रा नागपुर हे आरोपी 01 चि दिशाभुल करून त्रास देण्यास सांगत असल्याचे फिर्यादीचे रिपोर्ट व डॉक्टर रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 498 (अ), 323, 34 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि मलकुवार 9623687927 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर